18 MAR 2024
पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स्त्रियांना माणूस मानणारे शिवराय एकमेव राजे

## डॉ. मंजुश्री पवार; विद्यापीठाच्या इतिहास विभागातर्फे व्याख्यान




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित व्याख्यानमालेत बोलताना डॉ. मंजुश्री पवार. सोबत डॉ. भारती पाटील, डॉ. अवनीश पाटील**

**कोल्हापूर: पुढारी वृत्तसेवा**

स्त्रियांचा मानवतावादी दृष्टिकोनातून विचार करणारे छत्रपती शिवाजी महाराज हे एकमेवाद्वितीय राजे होते, असे गौरवोद्गार मराठा इतिहास अभ्यासक डॉ. मंजुश्री पवार यांनी काढले. शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागात छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३५० व्या शिवराज्याभिषेक दिनानिमित्त आयोजित छत्रपती शिवाजी महाराज व्याख्यानमालेत प्रमुख वक्त्या म्हणून त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी शारदाबाई पवार अध्यासन केंद्राच्या समन्वयक डॉ. भारती पाटील होत्या.

डॉ. पवार म्हणाल्या, छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याचा काळ आश्वासक काळ होता. त्यांनी स्त्रियांना समाजात आदराची व सन्मानाची वागणूक दिली. स्त्रियांवर अन्याय, अत्याचार करणारा कोणीही असो, त्याला अतिशय कडक शिक्षा केल्या. सद्यस्थितीत स्त्रियांवरील अत्याचारांत दिवसेंदिवस वाढ होत असताना केवळ छत्रपती शिवाजी महाराजांच्या घोषणा देऊन भागणार नाही, तर त्यांचे विचार आत्मसात करणे गरजेचे आहे.

अध्यक्षीय मनोगतात डॉ. पाटील म्हणाल्या, छत्रपती शिवाजी महाराजांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन नेहमीच समतावादी होता. त्याचे प्रतिबिंब त्यांच्या राज्यव्यवस्थेमध्ये आढळून येते. तत्कालीन राजेशाही व्यवस्थेमध्ये शिवाजी महाराजांपूर्वी व त्यांच्या नंतर अन्य कोणाही राजाने स्त्रियांच्या आदराची, सन्मानाची भूमिका घेतलेली दिसत नाही. म्हणूनच छत्रपती शिवाजी महाराज महान ठरतात. त्यांच्या विचारांचा जागर प्रत्येकाने करायला हवा.

इतिहास अधिविभाग प्रमुख डॉ. अवनीश पाटील यांनी प्रास्ताविक केले. राजश्री जगताप यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. दत्तात्रय मचाले यांनी आभार मानले. यावेळी मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. नंदकुमार मोरे, शिवचरित्रकार डॉ. इस्माईल पठाण आदी उपस्थित होते.

18 MAR 2024
ग्लोबल टाइम्स
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स्त्रियांचा मानवतावादी दृष्टीने विचार करणारे छत्रपती शिवाजी महाराज एकमेव राजे: डॉ. मंजुश्री

कोल्हापूर : स्त्रियांचा मानवतावादी दृष्टीकोनातून विचार करणारे छत्रपती शिवाजी महाराज हे मध्ययुगीन कालखंडातील एकमेवाद्वितिय राजे होते, असे गौरवोद्गार मराठा इतिहास अभ्यासक डॉ. मंजुश्री पवार यांनी काढले.

शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागात छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३५० व्या शिवराज्याभिषेक दिनानिमित्त आयोजित छत्रपती शिवाजी महाराज व्याख्यानमालेअंतर्गत प्रमुख वक्त्या म्हणून त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी प्रि. शारदाबाई पवार अध्यासन केंद्राच्या समन्वयक डॉ. भारती पाटील होत्या.

डॉ. मंजुश्री पवार म्हणाल्या, छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याचा काळ हा स्त्रियांच्या बाबतीत मानवतावादी दृष्टीकोनातून विचार करण्यासाठीचा आश्वासक काळ होता. मध्ययुगीन जगाच्या इतिहासामध्ये छत्रपती शिवाजी महाराज हे एकमेव राजे होते, ज्यांनी स्त्रियांना समाजात आदराची व सन्मानाची वागणूक दिली. स्त्रियांवर अन्याय, अत्याचार करणारा कोणीही असो, त्याला अतिशय कडक शिक्षा केल्या. सद्यस्थितील स्त्रियांवरील अत्याचारांत दिवसेंदिवस वाढ होत असल्याबद्दल त्यांनी चिंता व्यक्त केली. केवळ छत्रपती शिवाजी महाराजांच्या घोषणा देऊन भागणार नाही, तर त्यांचे विचार आत्मसात करणे गरजेचे आहे, असा सल्ला त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

अध्यक्षीय मनोगतात डॉ. भारती पाटील म्हणाल्या, छत्रपती शिवाजी महाराजांचा स्त्रीविषयक दृष्टीकोन नेहमीच समतावादी होता. त्यांच्या समतावादी दृष्टिकोनाचे प्रतिबिंब त्यांनी स्थापित केलेल्या प्रशासनिक राज्यव्यवस्थेमध्ये आढळून येते. औरंगजेबाच्या दरबारातील लेखक खाफिखान याने<sup></sup>ही शिवाजी महाराजांच्या स्त्रीविषयक दृष्टिकोनाचे कौतुक केले आहे. यावरून हे स्पष्ट होते की, तत्कालीन राजेशाही व्यवस्थेमध्ये शिवाजी महाराजांपूर्वी आणि त्यांच्या नंतरही अन्य कोणाही राजाने स्त्रियांच्या बाबतीत इतकी आदराची, सन्मानाची भूमिका घेतलेली दिसत नाही. म्हणून आजही छत्रपती शिवाजी महाराज महान ठरतात. त्यांच्या विचारांचा जागर प्रत्येकाने करायला हवा.



इतिहास अधिविभाग प्रमुख डॉ. अवनीश पाटील यांनी प्रास्ताविक केले. राजश्री जगताप यांनी सूत्रसंचालन केले तर डॉ. दत्तात्रय मचाले यांनी आभार मानले. व्याख्यानास मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. नंदकुमार मोरे, शिवचरित्रकार डॉ. इस्माईल पठाण यांच्यासह विविध महाविद्यालयांचे व अधिविभागाचे विद्यार्थी, संशोधक विद्यार्थी आणि इतिहासप्रेमी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 MAR 2024
तरुण भारत

# किटक नसतील तर अन्नसाखळी संपेल

प्रतिनिधी
कोल्हापूर

■ मनुष्याला अन्नयच मिळणार नसल्याचा संशोधकांचा दावा

शेतकऱ्यांनी शेतात लावलेले धान्य, फळे, फुलांमध्ये परागकण तयार करून उत्पन्न वाढ किटकच करतात. कोणत्याही फळाची गोडी वाढवण्यासाठी मधमाशीचा अतिशय महत्वाची भूमिका असते. मधमाशा संपल्या तर मानवाला अन्न मिळणे मुश्किल होईल. त्यामुळे जैवविविधतेतील किटक हा प्रकारही संवर्धत करण्याची गरज आहे. याच किटकांचे महत्व पटवून देण्यासाठी शिवाजी विद्यापीठातील प्राणीशास्त्र अधिविभागात किटकांचे प्रदर्शन भरवण्यात आले आहे.

प्राणीशास्त्र विभागाच्या संशोधकांनी २ हजार २००, किड्यांचे संकलन केले असून या किड्यांवर प्रक्रिया करीत प्रदर्शन भरवण्यात आले आहे. त्यासह भारतात आढळणारे ३० प्रगारचे टोळ, ९० प्रकाची झुरळ, रातकिडे, ढेकूण वर्गीय किटक, मृग नक्षत्रात पाहावयास मिळणारा किटक (काटी किडे), प्रार्थना आणि वाळवी किटकांसह विंचवाची मावशी प्रदर्शनात पाहायला मिळतात. अन्नसाखळीतील महत्वाचा घटक असलेल्या किडयांचे संवर्धनाची गरज आहे. प्रदर्शनातून विद्यार्थ्यांना, संशोधकांना किड्यांचे महत्व पटवून दिले जात आहे.

प्रदर्शनाचे उद्घाटन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते करण्यात आले. डॉ. माधुरी वाळवेकर यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. अधिविभाग प्रमुख डॉ. आशिष देशमुख यांनी आभार मानले. यावेळी प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, राजर्षी छत्रपती शाहू महाराज कृषी महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. एस. बी. खरबडे, व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे, डॉ. सागर डेळेकर, डॉ. नितीन कांबळे, डॉ. शिवानंद यन्कंची, डॉ. माधव भिलावे आदी उपस्थित होते.

18 MAR 2024 ग्लोबल टाइम्स


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात बारावीनंतर फिल्म मेकिंग कोर्स

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठात प्रथमच बी. ए. फिल्म मेकिंग हा बारावीनंतरचा तीन वर्षांचा पूर्णवेळ अभ्यासक्रम सुरू होत आहे. चित्रपटाशी संबंधित असलेला कॅम्पसमधील हा पहिलाच अभ्यासक्रम असून, येत्या शैक्षणिक वर्षापासून त्याची अंमलबजावणी होत आहे.

---

कोल्हापूरला चित्रपट क्षेत्राचा मोठा वारसा आहे. अनेक दिग्गज निर्माते, दिग्दर्शक आणि कलाकारांनी देशाच्या चित्रपटसृष्टीत मोठे योगदान दिले आहे. तथापि, चित्रपट विषयाचे शास्त्रीय प्रशिक्षण आजपर्यंत उपलब्ध नसल्याने विद्यार्थ्यांना पुणे किंवा मुंबईला जावे लागत होते. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू



प्रा. डॉ. दिगंबर शिर्के यांनी पुढाकार घेऊन चालू शैक्षणिक वर्षापासून चित्रपटविषयक अभ्यासक्रम सुरू करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार हा अभ्यासक्रम तयार झाला असून लवकरच त्याची अंमलबजावणी होत आहे. यामुळे विद्यापीठ कार्यक्षेत्रातील विद्यार्थ्यांसोबत बाहेरील विद्यार्थ्यांना चित्रपटाचा शास्त्रीय अभ्यास करणे शक्य होणार आहे.

बारावी पास असलेल्या कोणत्याही विद्यार्थ्यांना या अभ्यासक्रमाला प्रवेश घेता येतो. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार अभ्यासक्रमाची रचना करण्यात आली असून थिअरी आणि प्रात्यक्षिकांवर आधारित हा अभ्यासक्रम आहे. चित्रपट जगताशी संबंधित तज्ज्ञांकडून अभ्यासक्रम शिकवला जाणार आहे. अत्यंत कमी शुल्कात विद्यार्थ्यांना पूर्णवेळ अभ्यासक्रम पूर्ण करता येणार आहे. शिवाय नियमानुसार वसतिगृहाची सुविधा मिळणार आहे. या अभ्यासक्रमाला प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशन विभागात संपर्क साधावा, असे आवाहन विद्यापीठ प्रशासनाने केले आहे.

18 MAR 2024

ग्लोबल टाइम्स

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# इंद्रधनुष्यमध्ये शिवाजी विद्यापीठ उपविजेता



कोल्हापूर : गेल्या अनेक वर्षांपासून इंद्रधनुष्य युवक महोत्सवाचे विजेतेपद जिंकण्याची परंपरा मुंबई विद्यापीठाने अबाधित राखली. तर कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठाने अनपेक्षितपणे पुणे विद्यापीठाला मागे टाकून उपविजेतेपदी मुसंडी मारली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात इंद्रधनुष्य राज्यस्तरीय युवक महोत्सवाचा समारोप व पारितोषिक वितरण समारंभ शुक्रवारी (दि. १५) झाला. या महोत्सवात शिवाजी विद्यापीठ संघाने शोभायात्रेसह विविध कलाप्रकारांत प्रथम क्रमांक पटकावून उपविजेतेपदापर्यंत मजल मारली.

शिवाजी विद्यापीठाची महोत्सवातील कामगिरी अशी- सांस्कृतिक शोभा यात्रा (प्रथम क्रमांक), स्थळ छायाचित्रण (प्रथम), स्थळ चित्रण (प्रथम), कातर काम (प्रथम) भारतीय समूहगीत (प्रथम), मातीकाम (द्वितीय), शास्त्रीय नृत्य - (द्वितीय), सुगम गायन (द्वितीय), पाश्चिमात्य वाद्य वादन (द्वितीय), लघुपट (तृतीय), नाट्यगीत गायन (तृतीय), सांघिक रचनाकृती (तृतीय) आणि कला विभाग फिरता करंडक (सांघिक उपविजेते).

कुलगुरू डॉ. विजय फुलारी यांच्या अध्यक्षतेखाली समारोप सोहळा झाला. यावेळी प्रख्यात अभिनेत्री सोनाली कुलकर्णी यांची प्रमुख अतिथी म्हणून उपस्थिती होती. प्रकुलगुरू डॉ. वाल्मिक सरवदे, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. गजानन सानप, ॲड. दत्तात्रय भांगे यांची प्रमुख उपस्थिती होती. राज्यभवन निरीक्षण समितीचे अध्यक्ष डॉ. प्रमोद पाब्रेकर, वित्तीय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष डॉ. गोविंद कतलाकुटे, सदस्य डॉ. राजाराम गुरव, डॉ. संदीप आव्हाळे, डॉ. भारती लातूरकर, डॉ. दीपक नवघरे मंचावर उपस्थित होते. कुलसचिव डॉ. प्रशांत अमृतकर यांनी प्रास्ताविक तर संचालक डॉ. कैलास अंभुरे यांनी आभार मानले. सूत्रसंचालन डॉ. प्रेषित रुद्रवार व डॉ. समाधान इंगळे यांनी केले.

18 MAR 2024 पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थ्यांनी भविष्याचा वेध घेणे आवश्यक : शिंदे

गडहिंग्लज : प्रतिनिधी

विद्यार्थ्यांनी आपल्या भविष्याचा वेध घेणे आवश्यक आहे. आपल्या आवाक्यातील ध्येय ठेवा आणि या ध्येयाच्या दिशेने वाटचाल करावी, असे प्रतिपादन कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठाचे रजिस्ट्रार डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले.



गडहिंग्लज : शिवराज महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात बोलताना डॉ. व्ही. एन. शिंदे. उपस्थित प्रा. किसनराव कुराडे व अन्य.

येथील शिवराज विद्या संकुलामध्ये संभाजीराव माने ज्युनिअर कॉलेजच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या बारावीच्या विद्यार्थ्यांच्या शुभेच्छा समारंभात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी शिवराज विद्या संकुलाचे अध्यक्ष प्रा. किसनराव कुराडे होते.

प्रा. विनादेवी कुराडे यांनी स्वागत केले. यावेळी शिंदे यांनी 'यशस्वी होण्यासाठी' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.


डॉ. जीवन पाटील, प्रा. किसनराव कुराडे, सचिव डॉ. अनिलराव कुराडे, प्राचार्य डॉ. एस. एम.कदम, तानाजी चौगुले यांनी मार्गदर्शन केले. यावेळी प्रा. आझाद पटेल, प्रा. संदीप कुराडे, ए. बी. पाटील, प्रा. आर. डी. कमते, प्रा. किशोर अदाटे, प्रा. के. एस. देसाई, संदीप कुराडे, डॉ. संतोष शहापूरकर यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

18 MAR 2024 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. सकट यांचा विद्यापीठाला अभिमान : कुलगुरू

**कोल्हापूर :** प्रामाणिक आणि जबाबदारीने कामे करणारे विद्यापीठाचे उपकुलसचिव डॉ. उत्तम सकट यांच्या सामाजिक कार्याचा विद्यापीठाला अभिमान आहे, असे उद्‌गार कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी काढले.



कोल्हापूर : विद्यापीठाचे उपकुलसचिव डॉ. उत्तम सकट यांचा सत्कार करताना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के. सोबत मान्यवर.

डॉ. सकट यांना महाराष्ट्र शासनाचा २०२२-२३ साठीचा साहित्यरत्न लोकशाहीर आण्णा भाऊ साठे पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल प्रशासनातर्फे विद्यापीठाच्या व्यवस्थापन सभागृहामध्ये सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता, यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, उपकुलसचिव डॉ. एस. एम. कुबल यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. तानाजी चौगुले, अनुष्का कदम, डॉ. वैभव ढेरे आदी उपस्थित होते.

18 MAR 2024 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शाश्वत विकासासाठी स्वतःत बदल हवा

## अभ्यासकांचा सूर ; शहाजी महाविद्यालयात राष्ट्रीय चर्चासत्र

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १७ : "शाश्वत विकासासाठी माणसाने स्वतःमध्ये बदल करावा. जमीन, पाणी, ऊर्जा, पर्यावरणाचा समतोल आणि संतुलित वापर करावा. हव्यासासाठी आणि आरामासाठी पर्यावरणातील विविध घटकांचा बेसुमार वापर करू नये, अन्यथा याचे परिणाम आपल्यासह पुढच्या पिढीला भोगावे लागतील, त्यांच्यासाठी खूप किंमत मोजावी लागेल. पुढील पिढीसाठी चांगले पर्यावरण, आरोग्य, कायमस्वरूपी विकास राहण्यासाठी 'युनेस्को'ने सांगितलेली शाश्वत विकासाची १७ ध्येये अवगत करावीत. त्याची अंमलबजावणी स्वतःपासून करावी," असे आवाहन शाश्वत विकासावरती काम करणाऱ्या तज्ज्ञांनी केले.

> "आपले आरोग्य चांगले ठेवून नवनवीन कल्पनांचा स्वीकार करावा. शाश्वत विकासासाठी प्रयत्न करणाऱ्या माणसांची आज समाजाला गरज आहे.
> **- डॉ. ए. एम. गुरव,** शिवाजी विद्यापीठ वाणिज्य व व्यवस्थापन विभाग

श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयात 'भारतातील शाश्वत विकास : धोरणे व नवीन प्रवाह' यावरील राष्ट्रीय चर्चासत्र झाले. यात अभ्यासकांनी मते मांडली. प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण अध्यक्षस्थानी होते. रोपास जल अर्पण करून चर्चासत्राचे उद्घाटन झाले.

शिवाजी विद्यापीठातील वाणिज्य व व्यवस्थापन विभागाचे अधिष्ठाता डॉ. एस. एस. महाजन म्हणाले, "साधन संपत्ती मर्यादित आहे. पुढील पिढीसाठी ती राखून ठेवावी. पाणी कमी आणि लोकसंख्या जास्त असे चित्र आहे. त्यामुळे पाणी जपून वापरावे. रस्ते, महामार्ग बांधले की झाडांची कत्तल होते. यामध्ये केवळ झाडे नष्ट होत नाहीत, तर त्यावरील सर्व प्रजाती आणि सर्व जैवविविधता धोक्यात येते. स्वतःमध्ये बदल करून पाणी, ऊर्जा, जमिनीचा व्यवस्थित वापर करावा. नैसर्गिक पर्यावरणामध्ये अडथळा निर्माण करणाऱ्या प्लास्टिकसारख्या वस्तूंची निर्मितीही घातक आहे."

बेळगाव येथील केएलई इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड एज्युकेशन रिसर्चचे डॉ. पी. एम. कुलकर्णी म्हणाले, "टाकाऊ वस्तूपासून टिकाऊ वस्तू तयार करणे, कचऱ्यावर प्रक्रिया करून उद्योग तयार करणे, खराब पाण्याचे शुद्धीकरण करून शेतीसाठी उपयोग करणे, कृत्रिमरीत्या जंगल तयार करणे यातून व्यापार करता येईल."

डॉ. व्ही. व्ही. मैंदुर्गी, डॉ. ए. जी. सूर्यवंशी, डॉ. व्ही. एस. शिरगुरे, प्रा. यू. ए. पाटील, डॉ. के. व्ही. मारुलकर, प्रा. श्रीकांत बच्चे, डॉ. एम. ए. कोळी यांनी मनोगते व्यक्त केली. डॉ. आर. डी. मांडणीकर यांनी महाविद्यालयातील उपक्रमांची माहिती दिली. वाणिज्य विभागप्रमुख प्रा. संतोष कांबळे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. एम. ए. शिंदे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 MAR 2024
तरुण भारत



कोडोली ता. पन्हाळा येथील शिवाजी विद्यापीठ अंतर्गत व्हॉलीबाल स्पर्धेतील विजेत्या संघाचा सन्मान करताना डॉ. जॉन डिसुझा, डॉ. ए. एस. मंजप्पा व इतर

# विद्यापीठअंतर्गत व्हॉलीबॉल स्पर्धेत कोरे कॉलेज ऑफ फार्मसी विजेता

**वारणानगर :** कोडोली ता.पन्हाळा येथील वासंतीदेवी फार्मसी कॉलेजमध्ये शिवाजी विद्यापीठ अंतर्गत झालेल्या व्हॉलीबॉल स्पर्धेत कोरे कॉलेज ऑफ फार्मसी विजेता तर भारती विद्यापीठ कोल्हापूर उपविजेता ठरले. श्री यशवंत शिक्षण प्रसारक मंडळ संचलित वासंतीदेवी पाटील इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी येथे अग्रणी महाविद्यालया अंतर्गत नुकतीच हॉलीबॉल स्पर्धा झाली. ही स्पर्धा शिवाजी विद्यापीठ अंतर्गत असणाऱ्या विविध फार्मसी महाविद्यालयासाठी आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेमध्ये एकूण १४ महाविद्यालये सहभागी झाले होते. या स्पर्धेच्या उद्‌घाटनास प्रसंगी कोल्हापूर विभाग प्रमुख डॉ. जॉन डिसुझा, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ए.एस. मंजप्पा तसेच विविध महाविद्यालयातील क्रीडा समन्वयक उपस्थित होते. संस्थेचे सचिव डॉ. जयंत पाटील व विश्वस्त विनिता पाटील यांनी विजेता संघाचे अभिनंदन करून इतर संघांच्या भावी वाटचालीसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या. या स्पर्धेचे आयोजन महाविद्यालयाचे प्रा. उत्कर्ष नागवेकर व सूत्रसंचालन प्रा. ग्रीष्मा पाटील यांनी केले. यादरम्यान महाविद्यालयातील इतर विद्यार्थी,शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

18 MAR 2024
सकाळ

# हरिशंकर परसाईंचे व्यंग साहित्य कालातीत : माहेश्वरी

कोल्हापूर, ता. १७ : हिंदीचे लेखक हरिशंकर परसाई यांनी तत्कालीन सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक परिस्थितीवर केलेली व्यंग्यात्मक फटकेबाजी ही कालातीत आहे. त्यांचे समग्र साहित्य हे समाज सुधारणेसाठी महत्त्वपूर्ण असल्याचे मत अमळनेर येथील व्यंग समीक्षक डॉ. सुरेश माहेश्वरी यांनी व्यक्त केले.

हरिशंकर परसाई यांच्या जन्मशताब्दीनिमित्त शिवाजी विद्यापीठातील हिंदी विभागातर्फे वि. स. खांडेकर भाषा भवनमध्ये राष्ट्रीय चर्चासत्र घेण्यात आले. त्यामध्ये डॉ. माहेश्वरी बोलत होते. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील होते. त्यांनी हिंदी भाषेतून देश-विदेशांमधील रोजगाराच्या अनेक संधींविषयी माहिती दिली. प्रास्ताविकात डॉ. ए. एम. सरवदे यांनी हिंदी आणि इंग्रजी व्यंग साहित्याला असणाऱ्या व्यापक परंपरेवर प्रकाश टाकला.

18 MAR 2024
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिंदे अभियांत्रिकीमध्ये मिनी प्रोजेक्ट स्पर्धा

**गडहिंग्लज : प्रतिनिधी**

भडगाव (ता. गडहिंग्लज) येथील डॉ. ए. डी. शिंदे अभियांत्रिकी महाविद्यालयात लीड कॉलेज क्लस्टर, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर अंतर्गत मिनी प्रोजेक्ट स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेमध्ये सतरा कॉलेजमधून सत्तर विद्यार्थी सहभागी झाले होते. स्पर्धेचे उद्घाटन सूर्यकांत दोडमिसे यांच्या हस्ते करण्यात आले.




**भडगाव : मिनी प्रोजेक्ट स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिक वितरणप्रसंगी प्राचार्य बी. आर. उमराणी, डॉ. डी. व्ही. घेवडे यांच्यासह अन्य.**

स्पर्धेमध्ये ३५ नावीन्यपूर्ण मिनी प्रोजेक्ट विद्यार्थ्यांनी सादर केले. यामध्ये प्रतीक उत्तरेकर व सौरभ पाटील (डी. के. टी. ई. इचलकरंजी) यांनी प्रथम, अवधूत आपटे व अनिकेत बिरंजे (डॉ. ए. डी. शिंदे कॉलेज, भडगाव) यांनी द्वितीय, तर वरदराज पाटील व हर्ष देसाई (संत गजानन महाराज अभियांत्रिकी महाविद्यालय, महागाव) यांनी तृतीय क्रमांक मिळवला.

एस. जे. पी. एन. ट्रस्ट पॉलिटेक्निक निडसोशीचे प्राचार्य बी. आर. उमराणी, संस्थेच्या सचिव स्वाती कोरी, प्राचार्य डॉ. डी. व्ही. घेवडे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. प्राचार्य डॉ. डी. व्ही. घेवडे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा. एम. ए. बंदी, प्रा. एस. टी. दुंडगे यांनी स्पर्धेचे नियोजन केले. परीक्षक म्हणून रोबोसेप इनोव्हेशन, निपाणीचे व्यवस्थापकीय संचालक रोहित कदम यांनी काम पाहिले.

18 MAR 2024
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मुट कोर्टमुळे कायद्याचा सक्षम विद्यार्थी घडण्यास मदत

## जिल्हा न्यायाधीश शिवाजी साळुंखे यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी
कोल्हापूर

केवळ पुस्तकी ज्ञान पुरेसे नसून कोर्टात युक्तिवाद कसा करावा. याचा प्रत्यक्ष अनुभव मुटकोर्टद्वारे विद्यार्थ्यांना मिळतो. यामुळे सक्षम विद्यार्थी तयार होण्यास मोलाची मदत मिळते. सध्याच्या काळात अशा उपक्रमाची नितांत गरज आहे, असे प्रतिपादन जिल्हा न्यायाधीश शिवाजी साळुंखे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ विधी विभागाच्या वतीने मूट कोर्ट स्पर्धेचे आयोजन करण्यात आहे होते. जिल्हा न्यायाधीश एस. आर. साळुंखे, जिल्हा न्यायाधीश अपर्णा वाईकर आदी मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी ते बोलत होते.

विद्यापीठ विधी विभागप्रमुख डॉ. विवेक धुपदाळे यांनी कायद्याचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर कोर्टात कसा युक्तिवाद करावा, याचा प्रत्यक्ष अनुभव मिळणे महत्त्वाचे असते. यासाठी विधी विभागाच्या विद्यार्थ्यांसाठी मोठ्या स्पर्धेचे आयोजन केल्याचे सांगितले. नववी



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील विधी विभागाच्या वतीने आयोजित मूट कोर्टमध्ये मार्गदर्शन करताना जिल्हा न्यायाधीश शिवाजी साळुंखे. सोबत डॉ. विवेक धुपदाळे, न्यायाधीश अपर्णा वाईकर, न्यायाधीश व्ही. पी. गायकवाड, आदी.**

राष्ट्रीय मुटकोर्ट व वाद विवाद निवारण स्पर्धा झाल्या. न्यायाधीश व्ही. पी. गायकवाड, एस. ए. बाफना, के. आर. सिंघेल, पी. आर. राणे, एस. बी. देवरे, पी. एल. गुप्ता, ज्येष्ठविधीज्ञ गिरीश नाईक, माधव आचार्य यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. या स्पर्धेत नऊ महाविद्यालयांनी सहभाग नोंदवला. विधी अधिविभाग प्रमुख डॉ. वि. व्हाय. धुपदाळे यांनी लिहिलेले पुस्तकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे संयोजन आर. नारायण यांनी केले. यावेळी ॲड. प्रमोद दाभाडे, रोहिदास भांगरे, गौरव जवळकर, महेंद्र चव्हाण कार्तिक कुलकर्णी, देवदास चौगुले, जयदीप कदम, नागेश दरेकर, आश्विनी पाटील आदी उपस्थित होते.

**स्पर्धेचे विजेते व उपविजेते :** एल. एल. बी. मुटकोर्ट विजेते : व्ही. एम. साळगांवर (कॉलेज ऑफ लॉ पणजी, गोवा). उपविजेते (शहाजी लॉ कॉलेज, कोल्हापूर). **एल. एल. एम. मुटकोर्ट विजेते :** डिपार्टमेंट ऑफ लॉ, (शिवाजी विद्यापीठ). **उपविजेते :** (ईस्माईलसाहेब मुल्ला लॉ कॉलेज, सातारा). **मेडिएशन रोल प्ले विजेते :** (शहाजी लॉ कॉलेज कोल्हापूर). **उपविजेते :** डिपार्टमेंट ऑफ लॉ, (शिवाजी विद्यापीठ). **बेस्ट रिसर्चर एल. एल. बी. मुटकोर्ट :** नेहा एस. पोंब्रुफेंकर, व्ही, एम, साळगांवकर (कॉलेज ऑफ लॉ. गोवा). **बेस्ट रिसर्चर एल. एल. एम. मुटकोर्ट :** प्रियांका निकम (ईस्माईलसाहेब मुल्ला लॉ कॉलेज, कोल्हापूर). बेस्ट मूटर एल. एल. बी. मुटकोर्ट माहेश्वरी गुंडेवाडी (शहाजी लॉ, कॉलेज, कोल्हापूर). **बेस्ट मेडिएटर :** साईष्णू पंडित, (व्हिक्टर डान्टस लॉ कॉलेज, कुडाळ).